# व्यंकटेश महाविद्यालयात माजी-विद्यार्थी स्नेहमेळावा संपन्न

"श्री व्यंकटेश महाविद्यालयात सन १९८४-८५ च्या बी.कॉम. बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा संपन्न झाला या स्नेह मेळाव्यामध्ये एकूण शंभरहून अधिक माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विविध खेळ, संगीत कार्यक्रम, भोजन व मनोगते इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन या सदर मेळाव्या दरम्यान करण्यात आले होते. माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने निर्मित 'मैत्रगंध फाउंडेशन' या संस्थेद्वारे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मैत्रगंध फाउंडेशन ही माजी विद्यार्थ्यांनी मिळून निर्माण केलेली संस्था असून या संस्थेने आजवर अनेक समाज उपयोगी कार्य व कार्यक्रम केले आहेत." या स्नेह मेळाव्यादरम्यान त्यांनी मनोहर जाधव यांच्या स्मृती प्रित्यर्थ 'मनोहर जाधव स्मृती चषक' नावाने राज्यस्तरीय अंतर-महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा महाविद्यालयामध्ये दरवर्षी घेण्यात येतील असे आश्वासन त्यांनी दिले. स्वतः महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने हे देखील या बॅचचे विद्यार्थी आहेत तसेच माजी डी.वाय.एस.पी. श्री. दिनेश कटके, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे कोषाध्यक्ष व मैत्रगंध परिवाराचे, फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. शिवाजीराव शिंदे असे अनेक मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते जे या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये मैत्रिगंधचे अध्यक्ष श्री. शिवाजीराव शिंदे यांनी मैत्रगंध संस्थेच्या कार्याची ओळख संस्थेची ओळख करून दिली व महाविद्यालयात दरवर्षी मनोहर जाधव यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय अंतर-महाविद्यालयीन वक्तृत्व राज्यस्तरीय अंतर महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येतील असे प्रतिपादन केले व त्याच्या स्मृती चिन्हाचे अनावरण देखील करण्यात आले. या स्पर्धेसाठी प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिक अनुक्रमे ११,०००, ७,००० व ५,००० देखील जाहीर करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये अनेक माजी विद्यार्थी यांनी आपल्या महाविद्यालयातील जीवनाचा परिपाठ सांगितला अनेक महाविद्यालयीन आठवणींना उजाळा दिला महाविद्यालयामुळे आम्ही घडलो अनेक मोठ्या व्यक्ती या महाविद्यालयाने घडवल्या त्याबद्दल त्यांनी महाविद्यालयाचे ऋण व्यक्त केले. सहपरिवार, सहकुटुंब कार्यक्रमास उपस्थित राहिल्याने त्यांनी एकमेकांशी हितगुज साधले. कार्यक्रमांमध्ये मैत्रगंध फाउंडेशन परिवारातील सदस्यांच्या गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला त्याचबरोबर विविध गुणवान मान्यवरांचा देखील शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. तर महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक अमीन बंदर यांनी देखील नियोजनामध्ये मोलाचे सत्कार केले. सदर कार्यक्रमाच्या आयोजन व नियोजनासाठी श्री व्यंकटेश महाविद्यालय महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतकर कर्मचारी यांनी सहभाग घेतला आणि कार्यक्रमाची शोभा वाढवली. मैत्रगंध फाउंडेशनने आपल्या महाविद्यालयासाठी कमान उभी करावी अशी मागणी प्राचार्यांनी यावेळी केली व ती मैत्रिगंधमार्फत मान्य देखील करण्यात आल्यामुळे श्री व्यंकटेश महाविद्यालयास नवीन कमान येत्या काळात लाभेल अशी शक्यता आहे. सायंकाळी चहा पान घेऊन सर्वांनी निरोप घेतला. कार्यक्रमाची सुरुवात श्री. संजय कुलकर्णी यांच्या सरस्वती स्तवन व सरस्वती पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने झाली कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी सहाय्यक प्राध्यापिका कु. मोहिनी अंचलिया यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सुशील अग्रवाल यांनी आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.